पोलीस अधीक्षक, कार्यालय, पालघर.
जिल्हा मुख्यालय, कोळगाव, पालघर
दुरध्वनी – ०२५२५ - २५११००
E-mail: - sp. palghar@mahapolice.gmail.com

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# प्रेसनोट क्र. १९ दिनांक २२/०३/२०२३

# "जनसंवाद अभियान" अंतर्गत तलासरी पोलीस ठाणे येथे स्पर्धा परीक्षा शिबीराचे आयोजन

पालघर जिल्ह्यातील प्रत्येक गावामध्ये शांतता व सुरक्षीतता अबाधित राहावी तसेच पोलीस व जनता यांचेमध्ये सुसंवाद निर्माण व्हावा या उद्देशातून श्री. बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक, पालघर यांचे अनमोल संकल्पनेतुन **"जनसंवाद अभियान"** ही योजना सुरु करण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने आज दि.२२/०३/२०२३ रोजी तलासरी पोलीस ठाणे यांच्या वतीने जनसंवाद अभियानांतर्गत स्पर्धा परिक्षा व पोलीस भरती प्रशिक्षण शिबीराचे आयोजन पंचायत समिती सभागृह, तलासरी येथे करण्यात आले.

गुढीपाडवा व नुतन वर्षानिमित्त तलासरी पोलीस ठाणे यांच्या वतीने जनसंवाद अभियान अंतर्गत स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन शिबीरासाठी तलासरी व डहाणु तालक्यातील पोलीस भरतीच्या लेखी परीक्षेस पात्र झालेले एकुण १५० ते २००, पुरुष व महिला उमेदवार हजर होते.

सदर स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन शिबीरामध्ये मा. श्री बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक, पालघर यांनी मार्गदर्शन करताना **"जिंदगी की असली उडान बाकी है, आपके इरादो का इम्तिहान अभी बाकी है ! अभी तो नापी है मुठी भर जमीन, आगे सारा आसमान अभि बाकी है !"** अशी प्रेरणादायी सुरुवात करत विदयार्थ्यांशी संवाद साधत मार्गदर्शन केले. तसेच स्पर्धा परीक्षांना सामोरे गेल्याशिवाय आपल्यातील क्षमता आणि कुवत माहित होत नसते असा संदेश देत विदयार्थ्यांशी संवाद साधला. तसेच पोलीस भरती उमेदवार यांना मार्गदर्शन करताना कोणत्याही अडचणीवर मात करत पुन्हा पुन्हा प्रयत्न करावेत आणि जोपर्यंत यश प्राप्त होत नाही तोपर्यंत अधिक कष्टाने व जोमाने वाचन, अभ्यास करुन स्पर्धा परीक्षेत उतरणे आवश्यक आहे. पोलीस भरतीची परीक्षा देणाऱ्या विदयार्थ्यांनी अभ्यास करताना एकाच विषयावर अभ्यास न करता परीपुर्ण विषयाचा अभ्यास करावा व त्याच प्रमाणे यापुर्वी झालेल्या परीक्षेच्या प्रश्नपत्रिकांचाही अभ्यास करुन आकलन करावे आणि परीक्षेत चांगले गुण मिळवुन यश प्राप्त करावे. तसेच मा. अमादार श्री. विनोद निकोले यांनी कितीही संकटे आली तरी प्रयत्नाने संकटावर मात करुन मुख्य प्रवाहात येवुन यशाचा मार्ग प्राप्त करावा याबाबत मार्गदर्शन केले. त्याचप्रमाणे मा. आमदार श्री. श्रीनिवास वनगा यांनी पालघर पोलीसांमार्फत राबविण्यात येणारा जनसंवाद अभियान हा खुप छान उपक्रम असुन त्यांचा सर्व स्तरावर फायदा होत आहे असे वक्तव्य केले. सदर शिबीरामध्ये तज्ञ व्यक्तीकडुन स्पर्धा परिक्षेसंदर्भात मार्गदर्शन करण्यात आले असून उमेदवार यांना स्पर्धा परीक्षा पुस्तकांचे वाटप करण्यात आले.

नमूद कार्यक्रमास श्री. बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक, पालघर, श्री. संजीव पिंपळे, उपविभागीय पोलीस अधिकारी, डहाणु विभाग, आमदार श्री. विनोद निकोले, डहाणु विधानसभा, आमदार श्री. श्रीनिवास वनगा, पालघर विधानसभा, उपसभापती श्री. नंदकुमार हाडळ, पंचायत समिती, तलासरी श्री. अ
पोलीस निरीक्षक, तलासरी पोलीस ठाणे व पोलीस अंमलदार उपस्थित होते.